# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०७/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलीस स्टेशन खापाची कार्यवाही

दिनांक ०९/०७/२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, मौजा वाकोडी येथे काही इसम ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे विनापरवाना अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक करीत आहे. अशा खबरे वरून खापा येथील स्टाफ यांनी मौजा वाकोडी येथे नाकाबंदी लावून ट्रॅक्टर क्र. एम एच– ४०/ ए एम– १८८१ व ट्रॉली क्र. एम. एच–४० ए एम १९७४ मध्ये भरून असलेली ०१ ब्रास रेती किंमत अंदाजे ३०००/–रू. व ट्रॅक्टर क्र. एम एच– ४०/ए एम– १८८१ किंमती ५०००००/–रू व त्याला लागुन असलेली ट्रॉली क्र. एम एच ४० ए एम १९७४ किंमती १०००००/– रू. दोन पावडे कींमती २०० रू असा एकुण ६,०३,२००/–रू रुपयाचा मुद्देमाल **आरोपी नामे– १) विक्की शांताराम जनबंधु वय ३० वर्ष, २) कवडु शंकर सोसाटे, वय २५ वर्ष दोन्ही रा. वाकोडी ता. सावनेर** यांच्या ताब्यातून जप्त करून पोलीस स्टेशन खापा येथे अप. क्रमांक ३०६/२४ कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहीता २०२३ सहकलम ४८(७), ४८(८), महा ज म अधि. १९६६ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक १९८४, सहकलम ४, २१ खाण आणि खनिज (नियम आणि विकास अधि. १९५७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि. सुनिल दहीभाते, पोशि पन्नालाल बटाउवाले यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर